|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

## विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र.कबचौउमवि/14/46/ 137 /2019 दि.14/06/2019

प्रति,
**मा.प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख / नियंत्रक अधिकारी,**
कबचौउमविशी संलग्नित सर्व महाविद्यालये,
मान्यता प्राप्त परिसंस्था, विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा-विभाग, कबचौउमवि यांना

**विषय:- शैक्षणिक वर्ष 2019-20 मध्ये विद्यापीठामार्फत आयोजित होणाऱ्या कार्यक्रमांचे संयोजकत्व स्वीकारण्याबाबत ...**

महोदय/महोदया,

विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात/मान्यता प्राप्त परिसंस्थेत/विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा यामध्ये पदविका, पदवी व पद्व्युत्तर अभ्यासक्रमात नियमित शिक्षण घेणारा विद्यार्थी हा ग्रामीण, आदिवासी, दुर्गम व पर्वतीय भागातील आहे. या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबर स्वच्छ भारत अभियान अंतर्गत Clean Campus Mission, Digital India आणि विद्यार्थी-कुलगुरु संवादपर्व असे नाविन्यपूर्ण उपक्रम विद्यापीठाचे माननीय कुलगुरु महोदय प्रा.प्रदीप प्रे. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राबविले जात आहेत.

विद्यापीठ व्यवस्थापन परिषद, विद्यार्थी विकास मंडळ, कक्ष व समन्वय समिती यांच्या दिशा निर्देशानुसार विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती आलेखा बरोबर त्यांच्या व्यक्तिमत्व विकास, सुप्त कलागुणांना वाव मिळावा आणि त्यातूनच समाजासाठी सुजाण पिढी निर्माण व्हावी, त्यांचा आत्मविश्वास वाढावा, त्यांच्यात संघपणाची भावना निर्माण व्हावी व परस्परांविषयी स्नेहवर्धन वाढावे आदि दृष्टीकोन ठेवून दरवर्षी अभ्यासेत्तर उपक्रम राबविले जातात.

शैक्षणिक वर्ष 2019-20 करीता विद्यार्थी विकास विभागामार्फत प्रस्तुत परिपत्रकात नमूद स्पर्धा, परिसंवाद, महोत्सव, कार्यशाळा, मार्गदर्शन वर्ग व विशेष उपक्रम आदि. आयोजित करण्यात येत असून सदर कार्यक्रमाचे संयोजकत्व स्वीकारण्याकरीता दि.13 जून, 2019 रोजी झालेल्या विद्यार्थी विकास मंडळाच्या सभेतील ठराव क्र.विविमंस 3/2019 अन्वये आवाहन करीत आहोत. कृपया आपल्या प्रस्तावास प्राधिकरणाने मान्यता दिल्यास सदर उपक्रमाची जबाबदारी आपल्यावर सोपविण्यात येईल.

- **एक दिवसीय उपक्रम -**

| अ.क्र. | उपक्रमाचे नाव | संभाव्य कालावधी | अंदाजीत खर्च रु. |
|---|---|---|---|
| 1. | प्राचार्य/संचालक व विद्यार्थी विकास अधिकारी सभा (प्रथम सत्र/द्वितीय सत्र) | जून (दि. 15 ते 20)<br>डिसेंबर (दि. 1 ते 10) | प्रति व्यक्ती रु. 200/- |
| 2. | संगीत कौशल्य कार्यशाळा | जुलै (दि.1 ते 5) | एकत्रित रु.20,000/- |
| 3. | रॅगिंग प्रतिबंध समुपदेशन कार्यशाळा | जुलै (8 ते 12) | एकत्रित रु.5000/- |
| 4. | नाट्य कौशल्य कार्यशाळा | जुलै (दि.15 ते 20) | एकत्रित रु.20,000/- |
| 5. | साहित्य (काव्यवाचन / वक्तृत्व / वादविवाद) कौशल्य कार्यशाळा | ऑगस्ट (दि.1 ते 5) | एकत्रित रु.20,000/- |
| 6. | कै.भाईसाहेब वाय.एस.महाजन मुलींची वक्तृत्व स्पर्धा | ऑगस्ट (दि.10 ते 16) | एकत्रित रु.15,000/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 7. | नृत्य कौशल्य कार्यशाळा | ऑगस्ट (दि.20 ते 25) | एकत्रित रु.20,000/- |
| 8. | संशोधन प्रकल्प सादरीकरण स्पर्धा | सप्टेंबर (दि.1 ते 5) | प्रती व्यक्ति रु.200/- |
| 9. | आंतरमहाविद्यालयीन अभिरुप न्यायालय स्पर्धा | सप्टेंबर (दि.10 ते 15) | प्रती व्यक्ति रु.200/- |
| 10. | ललित कला अभ्यास कार्यशाळा | सप्टेंबर (दि.20 ते 25) | एकत्रित रु.20,000/- |
| 11. | "कै. ग. वी. अभ्यंकर मराठी नाट्यगीत व कै. शांताबाई अभ्यंकर मराठी भावगीत गायन" स्पर्धा | सप्टेंबर (दि.26 ते 30) | एकत्रित रु.15,000/- |
| 12. | आंतर महाविद्यालयीन वाणिज्य - प्रश्न मंजूषा व सादरीकरण ("कै. भास्कर सबनीस कॉमर्स क्विझ ॲण्ड प्रेझेंटेशन - कॉम्पीटीशन") स्पर्धा | ऑक्टोबर (दि.10 ते 12) | एकत्रित रु.15,000/- |
| 13. | नियतकालीक अंक संपादक मंडळाची कार्यशाळा (1 दिवस) | जानेवारी (दि. 26 ते 30) | प्रती व्यक्ति रु.200/- |

- **एक दिवसापेक्षा जास्त दिवसांचे उपक्रम -**

| अ.क्र. | उपक्रमाचे नाव | संभाव्य कालावधी | अंदाजीत खर्च रु. |
|---|---|---|---|
| 1. | विद्यापीठस्तरीय श्रमसंस्कार व्यक्तिमत्व व नेतृत्व विकास कार्यशाळा (3 दिवस) | जून (दि.21 ते 23) 2019 | प्रती व्यक्ति रु.200/- प्रती दिवस |
| 2. | मैत्री कार्यशाळा (3 दिवस) (जळगाव व धुळे-नंदुरबार जिल्ह्यासाठी) | जुलै (दि.22 ते 27) 2019 | |
| 3. | साहस कार्यशाळा (3 दिवस) (जळगाव व धुळे-नंदुरबार जिल्ह्यासाठी) | ऑगस्ट (दि.1 ते 5) 2019 | |
| 4. | क.ब.चौ.उ.म.वि. बहिणाबाई एकांकिका स्पर्धा (2 दिवस) | ऑगस्ट (दि.22 ते 26) 2019 | एकत्रित रु. 90,000/- |
| 5. | महाविद्यालय विद्यार्थी परिषद प्रतिनिधींसाठी (U.R.) नेतृत्व गुण विकास कार्यशाळा (2 दिवस) | सप्टेंबर (दि.29 ते 30) 2019 | प्रती व्यक्ति रु.200/- प्रती दिवस |
| 6. | युवा संसद कार्यशाळा व स्पर्धा (3 दिवस) | डिसेंबर (दि.05 ते 10) | |
| 7. | आदिवासी विद्यार्थी आत्मविश्वास व प्रेरणा विकास कार्यशाळा (3 दिवस) | डिसेंबर (दि.11 ते 21) 2020 | |
| 8. | रोजगार व व्यवसाय मार्गदर्शन (2 दिवस) (प्रती जिल्हा 1 याप्रमाणे) | जानेवारी (दि.08 ते 12) 2020 | |

- **विशेष उपक्रम**

| अ.क्र. | उपक्रमाचे नाव | संभाव्य कालावधी | अंदाजीत खर्च रु. |
|---|---|---|---|
| 1. | कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना (मागील वर्षाच्या नोंदणी विद्यार्थी संख्येच्या 2% (दोन टक्के) अथवा आवश्यक तेवढीच मागणी केलेली विद्यार्थी संख्या यापैकी जी कमी असेल ती.) | दि.16 जून 2019 ते 15 मार्च, 2020 पर्यत | विद्यापीठ हिस्सा रु.30/- + महाविद्यालय हिस्सा रु.10/- मंजूर (संख्येनुसार) एकूण रु.40/- प्रती तास |
| 2. | युवतीसभेतंर्गत **"व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा"** (परिसरातील विद्यार्थीनीसाठी एकदिवसीय व्याख्यानमाला अथवा 10 व्याख्याने ) | | प्रत्येकी एक रकमी रु.15,000/- |
| 3. | युवतीसभेतंर्गत **"स्वयंसिध्दा अभियान"** (50 विद्यार्थीनींच्या गटाकरीता 8 दिवस) | | |

| अ.क्र. | उपक्रमाचे नाव | संभाव्य कालावधी | अंदाजीत खर्च रु. |
|---|---|---|---|
| 4. | विद्यार्थी (मुले / मुली) व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा शैक्षणिक वर्षात खालील विषयांवर 10 व्याख्याने<br>1. व्यक्तिमत्व विकास<br>2. स्पर्धा परीक्षा<br>3. भाषण / संभाषण / सूत्रसंचालन कौशल्य<br>4. ताण तणाव मुक्त परीक्षा<br>5. जातीय सलोखा<br>6. राष्ट्रीय एकता व एकात्मता<br>7. सोशल मिडीया<br>8. लिंग समभाव<br>9. बेटी बचाओ बेटी पढाओ (मुली वाचवा - मुली शिकवा)<br>10. रोजगाराच्या संधी कशा शोधाव्यात ? | दि.16 जून 2019 ते 15 मार्च, 2020 पर्यत | एकत्रित रु.15,000/- |

- **महोत्सव :-**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | विद्यार्थी साहित्य संमेलन | ऑगस्ट 2019 | अंदाजपत्रक स्वतंत्र रु.1 ते 2 लाख |
| 2. | युवक महोत्सव | ऑक्टोबर (दि.1 ते 5) 2019 | अंदाजपत्रक स्वतंत्र रु.20 लाख (विद्यापीठ हिस्सा 70%) |
| 3. | दिव्यांग विद्यार्थी कला महोत्सव | नोव्हेंबर 2019 | अंदाजपत्रक स्वतंत्र रु.2 ते 3 लाख |

या पत्राद्धारे आपणास विनंती करण्यात येते की, वरील उपक्रमांच्या संयोजकत्वासाठी खालील माहिती पत्राव्दारे सादर करावी.

1) प्राचार्य/संचालक/विभाग प्रमुख यांचे नाव, दूरध्वनी क्र., भ्रमणध्वनी क्र., ई-मेल क्र.

2) विद्यार्थी विकास अधिकारी यांचे नाव, दूरध्वनी क्र., भ्रमणध्वनी क्र., ई-मेल क्र.

आदि माहितीसह उपक्रम आयोजनासाठी मुद्देनिहाय खर्चाचे अंदाजपत्रक आवश्यक ते प्रमाणे सादर करावेत.

## प्रस्तावाचा नमुना

---------------- उपक्रमाचे खर्च अंदाजपत्रक

**(प्रत्येक उपक्रमाचे स्वतंत्र अंदाजपत्रक द्यावे)**

| अ.क्र. | तपशिल | खर्च रु. |
|---|---|---|
| 1. | स्टेज, सभागृह, ध्वनी व्यवस्था व अनुषंगीक | |
| 2. | साधनव्यक्ती/परीक्षक प्रवास व मानधन | |
| 3. | स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र, बॅनर, स्टेशनरी व अनुषंगीक | |
| 4. | निवास व्यवस्था (आवश्यकतेनुसार) | |
| 5. | अल्पोपहार व भोजन (आवश्यकतेनुसार) | |
| 6. | किरकोळ खर्च | |
| | एकूण - | |

**टिपः- अर्थ सहाय्य करीता विद्यार्थी विकास बँक खाते पासबुकची छायांकित प्रत सोबत जोडत आहोत.**

**विद्यार्थी विकास अधिकारी**
स्वाक्षरी

**प्राचार्य/संचालक/विभाग प्रमुख**
स्वाक्षरी व शिक्का

**टिप :-** कमवा व शिका, विद्यार्थीनी **व्यक्तिमत्व विकास व स्वयंसिध्दा** करीता पत्रका सोबतच्या नमुन्यात माहिती सादर करावी.

कृपया आपला प्रस्ताव विद्यार्थी विकास विभागाकडे **दि. 29/06/2019** पर्यंत विद्यार्थी विकास विभागास पाठवावा. सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर www.nmu.ac.in आणि मोबाईल ॲप वर उपलब्ध आहे.

आपणास पुन:श्च विनंती करण्यात येते की, आपला उपक्रम संयोजकत्व स्वीकारण्याचा प्रस्ताव विद्यार्थी विकास मंडळाच्या सभेपुढे मंजुरीस्तव सादर करण्यात येईल. यांच्या मान्यतेनंतर आपणांस यथावकाश कळविण्यात येईल. विद्यार्थी विकास विभागाने उपक्रमांचे आयोजन विद्यार्थ्यांसाठी प्रस्तुत पत्रकात नमूद सोयी-सुविधानुसार करणे आवश्यक राहतील.

1) विद्यार्थी विकास मंडळांतर्गत संयोजनात्मक होणाऱ्या सर्व उपक्रमांची जबाबदारी मा. प्राचार्य/ संचालक/ विभागप्रमुख/ नियंत्रक अधिकारी यांनी विद्यार्थी विकास अधिकारी यांचेकडे सोपविण्यात यावी. विद्यार्थी विकास अधिकारी नियुक्त नसल्यास त्यांचा प्रस्ताव त्वरीत पाठवावा व मान्यता घ्यावी. **महाविद्यालयांचे प्राचार्य व विद्यार्थी विकास अधिकारी यांचे स्वतंत्र बँक खाते असणे आवश्यक राहील.** सदर खात्यामध्ये विद्यापीठाकडील अर्थसहाय्य जमा करण्यात येईल, याकरीता बँक खात्याच्या पासबुकची छायांकित प्रत संयोजकत्व स्वीकृती प्रस्तावासोबत सादर करावी.

2) उपक्रमासाठी साधन व्यक्ती (विषय तज्ञ) निमंत्रित करतांना विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विद्यार्थी विकास अधिकारी [Student Development Officer] यांना प्राधान्य द्यावे.

3) उपक्रमाचे निमंत्रण पत्रिका, कार्यक्रम पत्रिका, बॅनर, पत्रव्यवहार यावर कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, विद्यार्थी विकास विभाग व विद्यापीठाचा लोगो यांचा स्पष्ट उल्लेख करावा.

4) उपक्रमाचे उद्घाटन सकाळी 10.00 पूर्वी व समारोप सोहळा दु. 4.00 नंतर घेण्यात यावेत सदरचे कार्यक्रम 1 तासापेक्षा जास्तीचा नसावा व त्यावर जास्त खर्च करु नये.

5) उपक्रमाचा उद्घाटन/समारोप कार्यक्रमास विद्यापीठाचे मा.कुलगुरु, मा.प्र-कुलगुरु, विद्यार्थी विकास मंडळ, कक्ष व समितीचे उपाध्यक्ष, अधिकार मंडळाचे पदाधिकारी, सांविधानिक अधिकारी आमंत्रित करण्याचे ठरल्यास कृपया निमंत्रण पत्रिका व कार्यक्रम पत्रिका यांचे प्राथमिक मुद्दे तपासणीकरीता विद्यापीठ कार्यालयाकडे सादर करावीत. परस्पर ठरवू नयेत.

6) विद्यार्थी विकास विभागाच्या कार्यक्रमात सहभागी विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था खूर्ची/बेंच यावर करण्यात यावी. निवास व्यवस्था चांगली असावी. अंथरुण व पांघरुणची व्यवस्था करावी.

7) विद्यार्थी विकास कार्यशाळेत विद्यार्थी-विद्यार्थिनींना भोजन तयार करणे, वाढणे, स्वच्छता इ. कार्य देवू नये.

8) कार्यशाळा/उपक्रमाबाबत आपणाकडून तारीख व सविस्तर माहिती प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थी विकास विभाग विद्यापीठाच्या संकेत स्थळ व ॲप वर परिपत्रक प्रसिध्द करेल.

9) कार्यशाळा/उपक्रम अर्थ सहाय्य रु.200/- (त्यातच नियोजन, प्रत्यक्ष आयोजन, साधन व्यक्ति मानधन/प्रवास, चहा, नास्ता, भोजन व निवास व्यवस्था आणि अनुषंगिक खर्च भागवावा लागेल) प्रती व्यक्ति प्रती दिन अनुदान देण्यात येईल. (एखाद्या पुरवठाधारकांचे देयक रु. 5,000/- किंवा त्यापेक्षा जास्त असेल तर दरपत्रके (कोटेशन) कार्यक्रमापूर्वी किमान सात (7) दिवस आधी आमंत्रित करुन त्रिसदस्यीय समितीद्वारे पुरवठादार ठरवावा. तसेच पुरवठादाराचे देयक रु.30,000/- पेक्षा जास्त रकमेचे होत असेलतर नियमानुसार टी.डी.एस. (T.D.S.) कपात करण्याची जबाबदारी आपली राहील. देयक रक्कम रोख विरहीत (Cashless) पध्दतीने अदा करावी. या समितीचे अध्यक्ष उपप्राचार्य / वरिष्ठ प्राध्यापक राहतील, तर सदस्य म्हणून दोन प्राध्यापक तसेच सदस्य सचिव विद्यार्थी विकास अधिकारी राहतील, तद्नंतरच पुढील कार्यवाही करावी.)

उपरोक्त स्पर्धा, परिसंवाद, महोत्सव, कार्यशाळा व मार्गदर्शन वर्ग आयोजनाकरीता आपल्या मागणी नूसार विद्यापीठ प्रचलित पध्दतीत (अंदाजीत खर्च रक्कमेत विद्यार्थी विकास मंडळच्या निर्णयाने व प्रशासकीय ध्येय धोरणानुसार बदल होवू शकतो.) अग्रिम रक्कम देण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

(प्रा. सत्यजित साळवे)
**संचालक, विद्यार्थी विकास**

**सोबत :-**
1) कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना 2019-20 साठी प्रस्ताव अर्ज.
2) युवतीसभेतंर्गत विद्यार्थीनी व्यक्तीमत्व विकास योजना 2019-20 साठी प्रस्ताव अर्ज.
3) युवतीसभेतंर्गत विद्यार्थीनी स्वयंसिध्दा अभियान योजना 2019-20 साठी प्रस्ताव अर्ज.

**प्रतिलिपी** :-
1) मा. प्र वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव
2) जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव :- कृपया, वृत्तपत्रातून प्रसिध्दी द्यावी.
3) पध्दती विश्लेषक, संगणकशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव :- कृपया, संकेत स्थळ व ॲपवर प्रसिध्दी द्यावी.

*D:\\VBOXSVR\xp_data\My Doc\University Level Camp & Workshop sponcership 2019-20.docx*

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## विद्यार्थी विकास विभाग

### कर्मवीर भाऊराव पाटील 'कमवा व शिका' योजना २०१९-२० साठी प्रस्ताव

1) महाविद्यालयाचे नाव व पत्ता :- ----------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

2) प्राचार्य/ संचालकाचे नाव :- -----------------------------------------------------------------

3) विद्यार्थी विकास अधिकारी (नाव व पत्ता) :- ------------------------------------------------------------------------------------------------------------

दूरध्वनी क्र. (निवास) : ------------- (कार्यालय) : ---------------- भ्रमणध्वनी क्र. : ------------------

ई मेल - --------------------------------------------------------

4) महाविद्यालयाची मागील वर्षाची एकूण विद्यार्थी संख्या :-

अ) अनुदानीत (Granted) :- मुले ----------- मुली ------------ एकूण -----------

ब) स्वयंनिर्वाहित (Non-granted) :- मुले ----------- मुली ------------ एकूण -----------

अ) आणि ब) एकत्रित संख्या :- मुले ----------- मुली ------------ एकूण -----------

**5) मागील वर्षाच्या नमूद विद्यार्थी संख्येच्या 2 % (दोन टक्के) किंवा आवश्यकतेनुसार मागणी केलेली विद्यार्थी संख्या (यापैकी जी संख्या कमी असेल ती मंजूर करण्यात येईल) :- ---------**

अ) नियमानुसार मागासवर्गीय विद्यार्थी संख्या ब) नियमानुसार खुला गट विद्यार्थी संख्या

6) मागील वर्षी "कमवा व शिका" योजना कार्यान्वयीत होती काय ? - होय / नाही

7) मागील वर्षी सदर योजनेत सहभागी विद्यार्थी संख्या:-

| | SC | ST | DTNT | SBC | OBC | Open | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Male | | | | | | | |
| Female | | | | | | | |

8) विद्यार्थी विकास विभाग आणि "कमवा व शिका" योजनेच्या वतीने कोणते नवीन उपक्रम घ्यावेत या विषयीच्या सूचना : ----------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

9) सल्लागार समिती सदस्यांची नांवे :-

1) उपप्राचार्य /वरिष्ठ प्राध्यापक (प्राचार्य नामनिर्देशित) : पदसिध्द अध्यक्ष, ----------------------------------------

2) प्राध्यापक प्रतिनिधी (महिला) : सदस्य ------------------------------------------------

3) सामाजिक कार्यकर्ता : सदस्य ------------------------------------------------

4) विद्यार्थी प्रतिनिधी : सदस्य ------------------------------------------------

5) महाविद्यालयीन शिक्षकेतर सेवक : सदस्य ------------------------------------------------

6) विद्यार्थी विकास अधिकारी : सचिव ------------------------------------------------

विद्यापीठ योजने संबंधीची नियमावली आम्हास मान्य आहे, महाविद्यालयात/संस्थेत सन 2018-19 करीता "कमवा व शिका" योजना कार्यान्वित करणे करीता आम्हास मान्यता मिळावी, ही विनंती.

**टिप:- अर्थ सहाय्य करीता विद्यार्थी विकास बँक खाते पासबुकची छायांकित प्रत सोबत जोडत आहोत.**

**विद्यार्थी विकास अधिकारी**
सही व शिक्का

**प्राचार्य**
सही व शिक्का

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## विद्यार्थी विकास विभाग

### युवती सभा अंतर्गत
### 'विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास' कार्यशाळा २०१९-२० साठी प्रस्ताव

(व्याख्यानमाला / चर्चासत्र / कृतिसत्र / कार्यशाळा असा योग्य पर्याय निवडून प्रस्ताव पाठवावा)

1) महाविद्यालय /परिसंस्था/शैक्षणिक प्रशाळा ------------------------------------------------------
नाव व पत्ता :- ------------------------------------------------------

2) मा. प्राचार्य /संचालकाचे नाव :- ------------------------------------------------------

3) नियमित शिक्षक संवर्गाची संख्या :- पुरुष : ------------ स्त्री : ------------- एकूण : -------------

4) मागील वर्षाची सदर उपक्रमातील विद्यार्थी संख्या:-

| | SC | ST | DTNT | SBC | OBC | Open | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Female | | | | | | | |

5) विद्यार्थी विकास अधिकाऱ्याचे नांव व संपर्क क्रं.: -------------------------------------------------------------

6) उपक्रम संयोजकाचे नाव व संपर्क क्र. :- -------------------------------------------------------------------

7) युवती सभा कार्यशाळा सल्लागार मंडळाची नावे :

1) उपप्राचार्य /वरिष्ठ प्राध्यापक (प्राचार्य नामनिर्देशित) : पदसिध्द अध्यक्ष, --------------------------------------------
2) प्राध्यापक प्रतिनिधी (महिला) : सदस्य ----------------------------------------------------
3) सामाजिक कार्यकर्ता : सदस्य ----------------------------------------------------
4) विद्यार्थी प्रतिनिधी : सदस्य ----------------------------------------------------
5) महाविद्यालयीन शिक्षकेतर सेवक : सदस्य ----------------------------------------------------
6) विद्यार्थी विकास अधिकारी : सचिव ----------------------------------------------------

8) प्रस्तुत शैक्षणिक वर्षात युवती सभा कार्यशाळा योजनेंतर्गत विद्यार्थीनी व्यक्तीमत्व विकास योजना राबविण्यात येणा-या कार्यक्रमाचा आराखडा :-

----------------------------------------------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------------------------------------------

9) प्रस्तुत उपक्रमासाठी आमंत्रित करण्यात येणाऱ्या नियोजित साधनव्यक्तींची नावे, पत्ता, संपर्क क्रमांक व क्षेत्र :-

----------------------------------------------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------------------------------------------

10) प्रस्तुत उपक्रमासाठी उपलब्ध सुविधा :-

----------------------------------------------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------------------------------------------

11) इतर आवश्यक माहिती

----------------------------------------------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------------------------------------------

विद्यापीठ योजनेसंबंधी नियमावली आम्हास मान्य आहे. महाविद्यालय/ संस्थेत वर्ष 2019-20 करीता विद्यार्थीनी व्यक्तीमत्व विकास उपक्रम कार्यान्वीत करण्यासाठी आम्हास मान्यता मिळावी, ही विनंती.

**टिप:- अर्थ सहाय्य करीता विद्यार्थी विकास बँक खाते पासबुकची छायांकित प्रत सोबत जोडत आहोत.**

**विद्यार्थी विकास अधिकारी** **प्राचार्य / संचालक**
सही व शिक्का

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## विद्यार्थी विकास विभाग

### युवती सभा अंतर्गत
### ‘स्वंयसिध्दा-अभियान’ कार्यशाळा २०१९-२० साठी प्रस्ताव

1) महाविद्यालय /परिसंस्था/शैक्षणिक प्रशाळा ------------------------------------------------------
नाव व पत्ता :- ------------------------------------------------------

2) मा. प्राचार्य /संचालकाचे नाव :- ------------------------------------------------------

3) नियमित शिक्षक संवर्गाची संख्या :- पुरुष : ------------ स्त्री : ------------ एकूण : ------------

4) मागील वर्षाची सदर उपक्रमातील विद्यार्थी संख्या:-

| | SC | ST | DTNT | SBC | OBC | Open | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Female | | | | | | | |

5) विद्यार्थी विकास अधिकाऱ्याचे नाव व संपर्क क्रं.: ------------------------------------------------------

6) उपक्रम संयोजकाचे नाव व संपर्क क्र. :- ------------------------------------------------------

7) प्रस्तुत शैक्षणिक वर्षात स्वयंसिध्दा अभियान अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमाचा आराखडा :-
------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------

8) स्वंयसिध्दा अभियान योजनेच्या माध्यमातून घ्यावयाच्या स्वसंरक्षण प्रशिक्षणासाठी स्थानिक प्रशिक्षक उपलब्ध आहे काय ? :- होय / नाही
असल्यास, नाव, पत्ता, संपर्क क्रमांक व क्षेत्र :- ------------------------------------------------------
------------------------------------------------------

9) स्वंयसिध्दा-अभियान प्रशिक्षण कृती सत्रासाठी उपलब्ध असलेल्या सुविधा :-
------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------

10) मागील वर्षी आयोजित स्वंयसिध्दा अभियान प्रशिक्षणाबाबत अभिप्राय
------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------

विद्यापीठ योजनेसंबंधी नियमावली आम्हास मान्य आहे. महाविद्यालय/ संस्थेत वर्ष 2019-20 करीता विद्यार्थीनी स्वयंसिध्दा अभियान उपक्रम कार्यान्वयीत करण्यासाठी आम्हास मान्यता मिळावी, ही विनंती.

**टिप:- अर्थ सहाय्य करीता विद्यार्थी विकास बँक खाते पासबुकची छायांकित प्रत सोबत जोडत आहोत.**

**विद्यार्थी विकास अधिकारी**
सही

**प्राचार्य / संचालक**
सही व शिक्का

*D:\\VBOXSVR\xp_data\My Doc\University Level Camp & Workshop sponcership 2019-20.docx*